# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद

१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-४११ ००१

Email id :- mscepune@gmail.com फोन क्रमांक :- ०२०-२६१२३०६६/६७

जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/२०२०/२१९०
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-१,
दिनांक :- १०/०८/२०२०.

प्रति,

मा. व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
सेंट्रल मुंबई, मुंबई

**विषय :- संगणक टायपिंग, जीसीसी प्रमाणपत्र कोर्ससाठी प्रविष्ठ होणाऱ्या उमेदवाराना एस.टी. वाहतुकीची सवलत मिळणेबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयान्वये महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे यांचेमार्फत शासनमान्य संगणक टायपिंग, वाणिज्य प्रमाणपत्र टंकलेखन व लघुलेखन या कोर्ससाठी महाराष्ट्रातील मान्यता प्राप्त खाजगी संस्थांमार्फत प्रशिक्षण देण्यात येते.

या कोर्ससाठी दरवर्षी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातून किमान एकूण ३ ते ३.५ लाख उमेदवार प्रवेशित असतात. काही उमेदवार ग्रामीण भागातून तालुका अथवा जिल्हास्तरावर संस्थेत प्रशिक्षणासाठी येतात. या उमेदवारांना सदर प्रशिक्षणासाठी संस्थेपर्यंत ये-जा करण्यासाठी एस.टी.महामंडळाच्या विद्यार्थ्यांसाठी असलेली सवलतीच्या दरातील पास व्यवस्था मिळावी ही अपेक्षा आहे.

विद्यार्थ्यांना सवलत पास देताना संस्थेने दिलेले बोनाफाईड सर्टिफिकेट ज्यावर शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांची प्रतिस्वाक्षरी असलेले ग्राह्य धरण्यात यावे. तसे आपल्या सर्व आगार प्रमुखांना आपल्या स्तरावरुन कळवावे हि विनंती.

(तुकाराम सुपे)
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे-१

प्रत माहितीस्तव व कार्यवाहीस्तव सादर:-

१. विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)
२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद (सर्व)
३. आगार प्रमुख (सर्व), महाराष्ट्र राज्य परिवहन विभाग प्रमुख/आगार प्रमुख यांना उचीत कार्यवाहीस्तव.
४. संस्थाचालक/प्राचार्य (सर्व)

Desktop/GUNJAL SIR TYPING DOC 2652020